# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

दापोली ४१२ ७१२, जि. रत्नागिरी

# संशोधन शिफारशी २०२३

## पीक उत्पादन तंत्रज्ञानावर आधारीत शिफारशी

### विकसित व प्रसारीत केलेले पिकांचे वाण:

**१. भात-कोकण संजय (केजेटीआर-३):**


भाताचा कोकण संजय (केजेटीआर ३) हा अधिक उत्पादन देणारा निमगरवा, मध्यम उंची, लांबट बारीक दाण्याचा वाण महाराष्ट्र राज्यातील भात लागवड करणाऱ्या भागांसाठी शिफारस करण्यात येत आहे.





**२. भात-ट्राम्बे कोकण खारा (बीएआरसी केकेव्ही-१६):**

भाताचा टॉम्बे कोकणखारा (बीएआरसी केकेव्ही १६) हा अधिक उत्पादन , बुटका, निमगरवा, लांबट बारीक आणि तांदूळाची उत्तम गुणवत्ता असलेला वाण महाराष्ट्र राज्यातील किनारपट्टी लगतच्या क्षारयुक्त जमिनीमध्ये लागवडीकरीता शिफारसकरणेत येत आहे.





**३. वाली:**

कोकण विभागात वालीच्या लांब शेंगा असणाराआणि अधिक उत्पादन देणाराकोंकण शारदाहा वाण (DPL-YB-9) लागवडीसाठी प्रसारितकरण्यात येत आहे.



## यंत्रे व अवजारे

१. **'डीबीएसकेकेव्ही मासे ड्रेसिंग प्लॅटफॉर्म :**

मासे प्रक्रिया उद्योगामधील पूर्वप्रक्रिया विभागात मासे साफ करण्याकरीता 'डीबीएसकेकेव्ही मासे ड्रेसिंग प्लॅटफॉर्म' प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रमुख वैशिष्टये**

- मासे प्रक्रिया उद्योगामधील पूर्वप्रक्रिया विभागात मासे साफ करण्यासाठी उपयुक्त
- आराम दायक स्थितीमध्ये बसुन मासे स्वच्छ करता येतात
- स्त्रियांच्या मानववंश शास्त्रीय माहिती आधारीत सदर ड्रेसिंग प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला आहे.
- कामाच्या संबंधित शारिरीक दुखणे (उदा. पाय, गुडघा, पाठ व मानदुखी) कमी करण्यास उपयुक्त
- मासे साफ करण्याची स्वच्छ आरोग्यदायी पध्दत.
- विकसित यंत्रणेने मासे साफ करण्याची क्षमता ८५.६४ कि.ग्रॅ./तास (पारंपारिक पद्धती पेक्षा १६ टक्के जास्त)

**पीक उत्पादन तंत्रज्ञानावर आधारीत इतर शिफारशी**

**अ) नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन**

**कृषि हवामानशास्त्र**

१. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने शिफारशीत व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब केलेल्या कोकण विभागातील हापूस आंबा बागेमध्ये सप्टेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात (३८ वा हवामान आठवडा) आणि पुढील सात दिवसाच्या सरासरी तापमान नोंदीचा वापर करुन तीन किंवा चार आठवडे अगोदर पालवीचे पूर्वानुमान करण्याकरीता खालील हवामान आधारीत सुत्राची शिफारस करण्यात येत आहे.

हापूस आंब्याच्या पालवीचे पूर्वानुमान (तीन आठवडे अगोदर) = ३१.६०० + (०.७५७ x कमाल तापमान) - (०.५११ x किमान तापमान) (आर$^{२}$ = ०.७५)
हापूस आंब्याच्या पालवीचे पूर्वानुमान (चार आठवडे अगोदर) = २६.८४८ + (१.११० x कमाल तापमान)-(०.७६८ x किमान तापमान) (आर$^{२}$ = ०.६४)

२. बदलत्या हवामानात स्थिर उत्पादनासाठी सिंधुदुर्गजिल्ह्यामध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या हळव्या, निमगरव्या आणि गरव्या भात वाणांची खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे पेरणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पेरणी कालावधी | भात पिकाचे वाण | | |
|---|---|---|---|---|
| | | हळवे | निमगरवे | गरवे |
| १. | २३ वा हवामान आठवडा (०४ ते १० जून) | कर्जत-३ आणि फोंडाघाट-१ | पालघर-१, कर्जत-५ आणि कर्जत-९ | कर्जत-२ आणि रत्नागिरी-८ |

३. बदलत्या हवामानात स्थिर उत्पादनासाठी रत्नागिरी जिल्ह्यामध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या हळव्या, निमगरव्या आणि गरव्या भात वाणांची खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे पेरणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पेरणी कालावधी | भात पिकाचे वाण | | |
|---|---|---|---|---|
| | | हळवे | निमगरवे | गरवे |
| १. | २३ वा हवामान आठवडा (०४ ते १० जून) | - | कर्जत - ५ | - |
| २. | २४ वा हवामान आठवडा (११ ते १७ जून) | रत्नागिरी-१ | - | रत्नागिरी-३ आणि रत्नागिरी-८ |

४. बदलत्या हवामानात स्थिर उत्पादनासाठी रायगड जिल्ह्यामध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या हळव्या, निमगरव्या आणि गरव्या भात वाणांची खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे पेरणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पेरणी कालावधी | भात पिकाचे वाण | | |
|---|---|---|---|---|
| | | हळवे | निमगरवे | गरवे |
| १. | २३ वा हवामान आठवडा (०४ ते १० जून) | - | रत्नागिरी-६, रत्नागिरी-७, कर्जत-५ आणि कर्जत-९ | रत्नागिरी-८ |
| २. | २४ वा हवामान आठवडा (११ ते १७ जून) | कर्जत-७, कर्जत-३ आणि फोंडाघाट-१ | - | - |

(डॉ. बासाकोकृवि, दापोली)

५. बदलत्या हवामानात स्थिर उत्पादनासाठी पालघर जिल्ह्यामध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या हळव्याभात वाणांची खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे पेरणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पेरणी कालावधी | भात पिकाचे वाण |
|---|---|---|
| | | हळवे |
| १. | २४ ते २५ वा हवामान आठवडा (११ ते २४ जून) | कर्जत-७, कर्जत-३, रत्नागिरी-१ आणि फोंडाघाट-१ |

**जमीन सुपीकता आणि पीक अन्नद्रव्य व्यवस्थापन :**

६. कोकणामध्ये स्पायडर लीलीची लागवड ३० सेमी x ६० सेमी अंतरावर करुन हेक्टरी २५ टन शेणखत तसेच ३०० किलो नत्र, १०० किला स्फुरद आणि ५० किलो पालाश प्रति हेक्टरी देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

७. महाराष्ट्राच्या दक्षिण कोकण विभागामध्ये संकरित नेपिअर या चारा पिकाचे अधिक उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी डिएचएन-६ या जातीची लागवड करावी आणि या पिकास प्रति हेक्टरी अनुक्रमे २२५:७५:६० किलो नत्र:स्फुरद:पालाश खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे विभागून देण्याची शिफारस करण्यात येते.

| खत मात्रा देण्याची वेळ | नत्र किलो प्रति हेक्टरी | स्फुरद किलो प्रति हेक्टरी | पालाश किलो प्रति हेक्टरी |
|---|---|---|---|
| लागवडीच्या वेळी | ७५ | ३७.५ | ३० |
| पहिली भरणी (लागवडीनंतर ६० दिवसांनी) | ३० | ३७.५ | ३० |
| प्रत्येक कापणीनंतर (४ वेळा) | ३० | - | - |

८. महाराष्ट्राच्या कोकण विभागामध्ये आफ्रिकन टॉल जातीच्या चारा मका बियाण्याचे अधिक उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी बियाण्याची पेरणी ६० सेंमी x २० सेंमी अंतरावर करावी आणि शिफारशीत खत मात्रेच्या (१२० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ४० किलो पालाश प्रति हेक्टरी) पेरणीच्या वेळी अनुक्रमे ४८:५०:४० किलो प्रती हेक्टरी नत्र:स्फुरद:पालाश द्यावे, ३६ किलो नत्र पेरणीनंतर ३५ दिवसांनी तर ३६ किलो नत्र पेरणीनंतर ६० दिवसांनी देण्याची शिफारस करण्यात येते.

**तण व्यवस्थापन**

९. खरीप हंगामात रहु पेरणी पध्दतीने पेरलेल्या भात पिकामधील परिणामकारक तण नियंत्रण, अधिक उत्पादन आणि निव्वळ नफा मिळविण्यासाठी पेरणीनंतर २ ते ३ दिवसांनी ऑक्झाडायरझिल ८० टक्के १०० ग्रॅ. क्रियाशील घटक प्रति हेक्टर त्यानंतर मेटासल्फारान मिथाईल + क्लोरीमुरान ईथाईल ४ ग्रॅम क्रियाशील घटक प्रति हेक्टर पेरणीनंतर २५ दिवसांनी या तणनाशकांची फवारणी करावी किंवा ऑक्झाडायरझिल ८० टक्के १०० ग्रॅ. क्रियाशील घटक प्रति हेक्टर पेरणीनंतर २ ते ३ दिवसांनी फवारणी करुन ३० दिवसांनी पेरणी करावी अशी शिफारस करण्यात येते.

**पीक पध्दती व एकात्मिक शेती पध्दती**

१०. भात-मधूमका-मूग या पीक पध्दतीपासून अधिक उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळविण्यासाठी ३० मायक्रॉन चंदेरी काळ्या रंगाच्या पॉलीथीन आच्छादनाचा वापर करुन भात आणि मूग यांची पेरणी २५ सेंमी x २५ सेंमी अंतरावर आणि मधूमक्याची पेरणी ५० सेंमी x २५ सेंमी अंतरावर करण्याची शिफारस करण्यात येते.

११. महाराष्ट्राच्या कोकण विभागामध्ये ओट या चारा पिकापासून अधिक उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी प्रति हेक्टरी १०० किलो बियाणे वापरुन ४४ व्या हवामान आठवड्यात (२९ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर) पेरणी करण्याची शिफारस करण्यात येते.

**वनीकरण आणि कृषि वानिकी**

१२. कोकण विभागात वेखंड लागवडीपासून अधिक उत्पादन, अधिक तेलाचे प्रमाण, जमिनीचे गुणधर्म सुधारण्यासाठी आणि जास्त आर्थिक फायद्यासाठी १०० टक्के नत्र खतांची शिफारशीत मात्रा कोंबडी खताद्वारे (२.९० टन/हे.) किंवा लेंडी खताद्वारे (३.२३ टन/हे.) देण्याची शिफारस करण्यात येते.

**ब) उद्यानविद्या**

**१. आंबा**

कोकणात हापूस जातीची सुदृढ कोय कलमे तयार करण्यासाठी पिशव्या भरताना कोकोपीट + पानांचे खत + कंपोस्ट (१:१:२) मिश्रण वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**२. आंबा**

हापूस आंब्याची बिनडागी फळे मिळविण्यासाठी, फळाचे वजन वाढविण्यासाठी तसेच फळामधील साका व देठ कूज कमी करण्यासाठी फळे अंड्याच्या आकाराची झाल्यावर बाहेरुन तपकिरी (५३ जी.एस्.एम्.) व आतून काळ्या रंगाच्या (३५ जी.एस्.एम्.) २८ सेंमी x २० सेंमी आकारमानाच्या कागदी पिशव्या घालून ५० दिवसानंतर काढण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**३. काजू**

कोकण विभागात काजू बागेतून अधिक उत्पन्न मिळण्यासाठी सुरूवातीच्या पाच वर्षापर्यंत वाली या पिकाची आंतरपिक म्हणून रबी हंगामामध्ये लागवडीसाठी शिफारस करण्यात येते आहे.

**४. जायफळ**

जायफळ कलमे विक्रीयोग्य अवस्थेपर्यंतचा कालावधी कमी करण्याकरिता कलम केल्यापासून ४५ दिवसानंतर १५ दिवसांच्या अंतराने ६ वेळा ०.४ टक्के ह्युमिक ॲसिडची फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**५. काळीमिरी**

कोकण विभागात झुडूपवर्गीय काळी मिरी पासून अधिक उत्पादन व आर्थिक नफा मिळण्यासाठी रोपांची लागवड ५०% शेडनेट खाली १.५ मी.x १.० मी. अंतरावर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**६.** कोकणातील हवामान परिस्थितीमध्ये लाल ॲकॅलीफा, हिरवा ॲकॅलीफा, मालपीजिया, अरेलीया, क्रोटान आणि कोलीअस या शोभिवंत झाडांच्या सर्वांगिण वाढीसाठी ऑक्टोबर ते मे या कालावधीत ५० टक्के हिरव्या रंगाचे शेडनेट वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**क) पशु व मत्स्य विज्ञान**

**पशुविज्ञान**

**रवंथ न करणारे प्राणी**

१. कोकण कृषि विदयापीठ विकसित कमीखर्चाचे व उत्तम उबवणूक क्षमता असलेलेस्वयंचलीत अंडी उबवणूक यंत्र वापरण्याची शिफारस करण्यात येते.

**मत्स्यविज्ञान**

**सागरी मत्स्य व्यवसाय**

१. सिगॅनसकॅनालिकुलॅटस (मुत्री मासा) मध्येदोकोसहेक्जानोइक ऍसीड (डीएचए) ओमेगा-३ फॅटी ऍसीडचे प्रमाण आधिक असल्याने या माशाचा उपयोगकरून मुल्यावर्धित पदार्थ तयार करण्याची शिफारस करण्यात येते.

२. रत्नागिरी किनारपटटीवर मिळणाऱ्या बांगडा व सौंदाळा या मत्स्य जातींच्या एकुण उत्पादनापैकी अर्ध्या पेक्षा जास्त हिस्सा (बांगडा-५४.०४%, सौंदाळा-५१.०४%) अपरिपक्व मासळीचा (प्रजननक्षम नसलेल्या) असल्याकारणाने आर्थिक व पर्यावरणीय नुकसानकमीकरण्यासाठी अपरिपक्व मासळीची मासेमारीकमीकरण्याची शिफारसकरण्यात येत आहे.

**भुजलातील मत्स्य व्यवसाय**

४. काळी सैनिकी माशी(हरमेटिया इल्यूसेनसच्या) मादीपासून नैसर्गिक अंडी पुंज मिळविण्याकरिता यिस्टच्या पाण्यामध्ये गव्हाचा कोंडा आणि कोंबडीचे कृत्रिम खादय समप्रमाणात भिजवुन,त्यात प्रोबायोटिक्स टाकावे. हे सर्व मिश्रण दोन दिवसाकरिता प्लास्टीक पिशवीमध्ये हवाबंद करून किण्वन प्रक्रियेसाठी ठेवून वापण्याची शिफारसकरण्यात येत आहे.

५. स्वोर्डटेल माशांच्या सर्वोत्तम वाढीसाठी पाण्याची जडता ६० मि. ग्र.प्रति लिटर (कॅल्शियम क्लोराइड- १.०३८ मि.ग्रॅ/ लि. आणि मॅग्रेशियम क्लोराईड- ०.०९६ मि.ग्रॅ/ लि.)ते १२०मि. ग्र. प्रति लिटर (कॅल्शियम क्लोराइड २.०७५ मि.ग्रॅ/ लि आणि मॅग्रेशियम क्लोराईड- ०.१९२ मि.ग्रॅ/ लि) दरम्यान ठेवण्याची शिफारसकरण्यात येते.

६. सुधारीत जनुकीय संवर्धित (GIFT) च्यातिलापियाच्या उत्तम वाढीसाठी(९ते १०ग्रॅ) २.५ ते ३.५ से.मी आकाराच्या बीजाचे बायोफ्लॉक पध्दतीने ७५ आणि १०० नग प्रति घनमीटर अशा घनतेने साठवणूक करून २ ते २.५ महिनेसंगोपनकरण्याचीशिफारसकरण्यात येते.

**इ) काढणीपश्चात व्यवस्थापन**

**(अभियांत्रीकी पैलू वगळता दुग्धशाळा तंत्रज्ञान, मत्स्यपालन, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी)**

१. उत्तम प्रतीच्या जास्तीत जास्त सुगंधी तेलाच्या उत्पादनासाठी सुरंगीची पूर्ण तयार झालेली उमललेली फुले तोडून २ दिवसापर्यंत तेल काढण्यासाठी वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. लेंडी पिंपरीचे पॉलीथिलीन टेट्रेफ्थालेट (पीईटी) जारमध्ये जास्तीत जास्त पाईपरीन, सुगंधीत तेल आणि रासायनिक गुणधर्म स्थिर राहत असल्याने, ६ महिन्यांपर्यंत साठविण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. ताजे हळदीचे कंद ८०.५%, पाणी १५%, व्हिनेगर ४%, स्टार्च ०.५% आणि २५० पीपीएम सोडियम बेन्झोएट वापरुन १.२३ पा.से. चिकटपणाची हळदीची पेस्ट तयार करुन रिटॉर्टेबल पाऊचमध्ये रेफ्रिजरेटेड परिस्थितीला १८० दिवसापर्यंत साठवण्याच्या प्रक्रियेच्या तंत्रज्ञानाची शिफारस करण्यात येत आहे.

**फ) पीक संरक्षण**

**वनस्पतीरोगशास्त्र (बुरशीजन्य आणि विषाणुजन्य)**

१. कलिंगडावरील शेंडेमर रोगाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी तसेच या पिकापासून अधिक नफा मिळण्यासाठी पुढील प्रमाणे एकात्मिक पीक संरक्षण प्रणालीचा अवलंब करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

    १. पेरणीपुर्वी शेतामध्ये ३० मायक्रॉन जाडीच्या काळया रंगाच्या प्लास्टीक कापडाचे अच्छादन करावे.

    २. सुडोमोनस फ्लोरोसंस या जैव घटकाची ५ ग्रॅम प्रती लिटर या प्रमाणात प्रत्येक आळयात ५० मिली या प्रमाणे पीक दोन पानाच्या आवस्थेत असतांना आळवणी करावी.

    ३. कलिंगड पिकामध्ये ३० निळे चिकट सापळे प्रति हेक्टरी या प्रमाणे लावावेत.

    ४. पीक ३० दिवसांचे असताना ईमिडाक्लोप्रिड १७.६ एस एल (०.३ मिली प्रति लिटर) या किटकनाशकाची फवारणी करावी.

    ५. पीक ४५ दिवसांचे असतांना ॲझाडिरॅक्टीन (१०००० पीपीएम) २ मिली प्रति लिटर पाण्यातून एकदा फवारणी करावी.

**कृषि किटकशास्त्र**

१. डंखविरहीत मधमाशीची वसाहत नैसर्गिक अधिवासामधुन पकडण्यासाठी डॉ. बा. सा. को. कृ. विदयापीठ, दापोली येथे विकसित केलेल्या खालील तंत्रज्ञानाची शिफारस करण्यात येत आहे.

तंत्रज्ञान आकृती | विवरण




१. पावसाळा संपल्यानंतर पी.व्ही.सी. पाईप सापळा @ दोन कप्पे (३" -२० सेमी आणि २.५" -१८ सेमी) तयार करावा.
२. त्याच्या पुढच्या भागास खालील बाजुस ५ मिमी आकाराचे मधमाशीला प्रवेश करण्यासाठी छिद्र करावे.
३. ५ इंच लांबीचा आणि २५ मिमी व्यासाचा छोटा पाईप घ्यावा.
४. सदर पी.व्ही.सी. पाईप सापळयाच्या मागच्या बाजुच्या वरच्या भागावर घट्ट बसवुन दुसरे टो डंखविरहीत मधमाशीच्या नैसर्गिक अधिवासाच्या प्रवेशव्दारामध्ये घट्ट बसवावा.
५. चिकट किंवा सिमेंट घटकाने इतरत्र असलेल्या भेगा व भोके बंद करावेत.
६. सदर सापळा वसाहत पकडण्यासाठी चार माहिने तसाच ठेवावा.

**ग) कृषि अभियांत्रिकी**

**अपांरपारीक उर्जा अभियांत्रिकी**

१. डॉ. बासाकोकृवि विकसित स्वयंपाकघरातील टाकाऊ पदार्थ आधारित २० लि. क्षमतेच्या बायोगॅस संयत्राची कचरा व्यवस्थापनाकरीता शिफारस करण्यात येत आहे.

**प्रक्षेत्र संरचना**

२. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली विकसित अधिक उंचीच्या (गटर हाईट = ४.६ मी) बांबू पॉलीहाऊसची, पिकांसाठी योग्य वातावरण नियंत्रित करणे आणि पिकाची पूर्ण उत्पादन क्षमता वापरुन घेण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.
३. बांबू पॉलीहाऊसची उभारणी करतेवेळी बांबू स्ट्रकचरल मेम्बर्स जोडण्यासाठी डॉ. बा. सा. को. कृ. वि. दापोली विकसित 'डीबीएसकेकेव्ही इनोवेटिव्ह जॉइंट्स' चा वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**डिजीटल शेती**

४. डॉ.बा.सा.को.कृ.वि.,दापोली विकसित "डीबीएसकेकेव्ही सोलर रेडिएशन शिल्ड (DSRS-V1)' विविध कृषि व इतर औद्योगिक उपक्रमांत हवेचे तापमान आणि सापेक्ष आर्द्रता अचूकपणे मोजण्यासाठी संबंधित सेन्सरसह वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.
५. डॉ.बा.सा.को.कृ.वि., दापोली विकसित "डीबीएसकेकेव्ही स्वयंचलीत (ऑटोमेटेड) फॉगिंग सिस्टिम (DAFS)' चा वापर नैसर्गिक वायुविजन असलेल्या पॉलीहाऊसमधील पिकांसाठी हवेचे तापमान व आर्द्रता (हवेचा बाष्प निर्देशांक) योग्य पातळीवर नियंत्रित करण्यासाठी वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

६. डॉ.बा.सा.को.कृ.वि.,दापोली विकसित ''डीबीएसकेकेव्ही बांबू पॉलीहाऊस डिझाईन कॅल्क्युलेटर (डी. बी. पी. डी. सी.)' विविध आकारांच्या नैसर्गिक वायुविजन असलेल्या बांबू पॉलीहाऊसच्या स्ट्रक्चरल मेम्बर्सचे मापदंड (डीझाईन) निश्चित करण्यासाठी वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**उ) सामाजिक शास्त्रे**

**कृषि विस्तार शिक्षण :**

१. या अभ्यासावरुन अशी शिफारस करण्यात येते की, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने सार्वजनिक खाजगी भागीदारी पध्दतीने संकरीत भात जातींच्या बीजोत्पादनाचा कार्यक्रम मोठया प्रमाणात हाती घ्यावा.

२. या अभ्यासावरुन अशी शिफारस करण्यात येते की,

- कोकण विभागात रोजगार निर्मितीसाठी फळे आणि भाजीपाला प्रक्रियेविषयीचे अधिक प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात यावेत. प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान विपणन, पॅकेजिंग आणि प्रकल्प प्रस्ताव तयार करण्याविषयीची माहिती देण्यात यावी.
- फळे आणि भाजीपाला प्रक्रियेतील उद्योजकता विकासाशी संबधित विविध विस्तार यंत्रणा योजनांबद्दल ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध असलेल्या माहितीसंबंधी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

**कृषि अर्थशास्त्र :**

१. काजूगरांची देशांतर्गत मोठी मागणी, तसेच उत्पादनापेक्षा जास्त काजू प्रक्रिया क्षमता (१६.२४ लाख मे. टन) असुनही तुलनेने कमी होत असलेली निर्यात त्याचबरोबर आफ्रिकन देशातील प्रक्रिया क्षमतेमध्ये होणारी वाढ आणि त्यामुळे भविष्यात भारतामध्ये होणारी संभाव्य कमी आयात याचा विचार करता कोकणातील एकूण लागवडी लायक क्षेत्रापैकी (१५.२१ लाख हे.) काजू लागवडीस असलेला वाव लक्षात घेवून काजू निर्यात वाढीसाठी आणि स्वयपूर्ण होण्यासाठी पुढील ३ वर्षामध्ये कोकणामध्ये एकूण ४६२४४ हे. क्षेत्र (रत्नागिरी १६५२२ हे, सिंधुदुर्ग ५६४६ हे, रायगड १३५७० हे, ठाणे ४५१५ हे, पालघर ५९९२ हे) नव्याने लागवडीखाली आणण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

******